# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 09/02/2024 (शुक्रवार) सायंकाळ

---

## अवैध्यरीत्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या ट्रॅक्टर ट्रॉलीवर नागपूर ग्रामीण पोलीसांची कार्यवाही

दिनांक ०९/०२/२०२४ चे ०२/२० वा. दरम्यान मौदा पोलीसांचे पथक पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असताना माहीती मिळाली की, एक इसम ट्रॅक्टर ट्रॉलीच्या साहाय्याने रेती भरुन चोरटी वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या विश्वसनीय माहीती वरून मौदा पोलीसांनी नाकाबंदी केली असता मौजा आजनगाव शिवार, ता. मौदा येथे एक सिल्व्हर रंगाचा क्रमांक नसलेला आयसर कंपनीचा ट्रॅक्टर व एक लाल रंगाची विना क्रमाकाची ट्रॉली मध्ये **आरोपी नामे— पवन अर्जुन चौधरी, वय २८ वर्ष, रा. धामनगाव ता. मौदा जि. नागपूर** हा आपले ताब्यातील ट्रॅक्टरच्या साह्याने ट्रॉली मध्ये सांड नदीचे पात्रातुन अवैधरित्या विनापरवाना रेती चोरी करून वाहतुक करीत असतांना मिळुन आल्याने त्याचे ताब्यातून १) एक सिल्व्हर रंगाचा क्रमांक नसलेला आयसर कंम्पनीचा ट्रॅक्टर किंमती ७००००० /—रू चा २) एक लाल रंगाची विना क्रमाकाची ट्रॉली किंमती १००००० /—रू ३) एक ब्रास रेती किंमती ५००० /—रू. असा एकूण ८०५००० /— रु. चा मुद्देमाल जप्त केला असुन सदर विनाक्रमांकाची ट्रॅक्टर ट्रॉली चालक **आरोपी नामे— पवन अर्जुन चौधरी, वय २८ वर्ष, रा. धामनगाव ता. मौदा जि. नागपूर** यांच्या विरूध्द पो.स्टे. मौंदा येथे अप. क्र. ११५/२४ कलम ३७९ भा.दं.वी सहकलम ४८(८) महा. जमीन महसुल अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार, अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. पुंडलिक भटकर तसेच पोलीस स्टेशन मौदा येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक सतीषसींह राजपुत, पोलीस हवालदार संदीप कडू, गणेश मुदमाळी, रूपेश महादुले, पोलीस नायक दीपक दरोडे यांनी केली.



# घरफोडी करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. कळमेश्वर:– अंतर्गत कॉन्फीडन्स पेट्रोलियम इंडीया कंपनी लिमिटेड कंपनी रेल्वे स्टेशन कळमेश्वर येथे दिनांक ०३/११/२०२३, दि. २५/१२/२०२३, दि. २७/०१/२०२४, दि. ०४/०२/२०२४, दि. ०८/०२/२०२४ दरम्यान दि. ०७/०२/२०२४ रोजी रात्री संतोष परते यांची सेक्यूरिटी सूपरवायझर म्हणून नाईट डयूटी होती. पहाटे ०३/०० वा. सूमारास संतोष यांनी फिर्यादी नामे– राजेंद्र रामरावजी भगत, वय ५० वर्षे, रा. प्लॉट नं. २, हरिओम सोसायटी, झिंगाबाई टाकळी नागपूर (कॉन्फीडन्स पेट्रोलियम इंडीया कंपनी लिमिटेड कंपनीत मैनेजर) याला फोन करून माहिती दिली कि, तिन अनोळखी ईसम खाली असलेले एक्सपायर हॉट रिपेयर १४.२ कि.ग्रॅ. खाली सिलेंडर भारत गैस कंपनीचे उचलून नेत होते. यातील दोन इसम पळून गेले व एक इसमाला पकडून त्याचे नाव पत्ता विचारले असता त्यांनी आपले नाव १) देवेंद्र गंगाधर डांगे, रा. मालेगाव ता. सावनेर असे सांगितले. कळमेश्वर पोलीसांनी तपासा दरम्यान त्याचे इतर साथीदार नामे– २) **पवण सुरेंद्र हणवते, वय २८ वर्ष, रा. मेंढकि ता. काटोल ह. मु. गुरूव्दारा सावनेर ३) अजय कुंजीलाल सरियाम वय २८ वर्ष रा. मालेगाव ता. सावनेर ४) देवेन्द्रसिग लक्ष्मणसिंग राजपुत वय २८ वर्ष, रा. झाल्डा जि. राजगड (म.प्र) ह. मु. बोरूजवाडा** यांना अटक करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीतांविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८०, ५११, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि कोलते मो. नं. ८०८०९५५५८९ हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार, अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन कळमेश्वर येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक योगेश कमाले, पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय कोलते, सहायक फौजदार मनोज गाढवे, सफौ धुर्वास बांबल, पोलीस नायक राजेंद्र ठाकरे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर